पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना
पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

# प्रेस नोट

पोलीस अधिक्षक जालना या घटकाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई (१०२) रिक्त पदासाठी सन २०२२-२०२३ ची भरती प्रकिया अंतर्गत उमेदवारांची मैदाणी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ ते २३/०६/२०२४ या दरम्यान पोलीस मुख्यालयाचे परेडग्राऊंडवर घेण्यात आली होती सदर चाचणीमध्ये पात्र व उपलब्ध झालेल्या उमेदवारांपैकी १:१० प्रमाणे उमेदवाराची प्रवर्गनिहाय यादी या कार्यालयाचे संकेतस्थळावर दिनांक २९/०६/२०२४ रोजी प्रसिध्द करुन सदर उमेदवारांना दिनांक ०७/०७/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा.जे.ई.एस.कॉलेज, दुर्गामाता मंदीर रोड जालना येथे लेखी परीक्षे करीता उपस्थीत राहण्या बाबत सूचीत करण्यात आलेले आहे.

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी घेण्यात येणारी लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांना खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**उमेदवारांसाठी सुचना :-**

१) लेखी परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवार,दिनांक ०७/०७/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वाजता उपरोक्त नमुद ठिकाणी लेखी परिक्षेसाठी हजर राहावे.

२) सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये दिलेल्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे, सकाळी ०९.१५.वाजे नंतर परीक्षेसाठी उमेदवारांना कोणत्याही परिस्थीतीत परिक्षेस बसन्याची परवानगी देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) उमेदवारांनी परिक्षेसाठी येतांना पासपोर्ट साईज फोटो, शासकिय ओळखपत्र,महाआयटीकडून यापुर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र, लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र, या कार्यालयाकडून शारीरीक चाचणीवेळी देण्यात आलेले पोलीस भरती ओळखपत्र न चुकता सोबत आणणे बंधनकारक आहे.

४) प्रत्येक परिक्षा हॉल मध्ये एक घडयाळ लावण्यात येणार असल्याने उमेदवाराने घडयाळ व कोणतेही किंमती साहित्य सोबत आणु नये.

५) उमेदवारांना काळया शाईचे पेन परीक्षेचेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार असल्याने मुद्या क्रमांक ३ व ४ मधिल नमूद कागदपत्रांव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर घेवून येण्यास सक्त मनाई आहे.

६) उमेदवारांनी मोबाईल,वॉच,स्मार्ट वॉच,गणकयंत्र इतर कोणतेही ब्लुटूथ यंत्र अगर इलेक्ट्रॉनिक यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे, तसे निदर्शनास आल्यास, अथवा उमेदवार इतर कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करीत असल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधित उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रक्रियेतून तात्काळ अपात्र केले जाईल.

७) उमेदवारांचे पालक व मित्रांना परिक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेशबंदी आहे.

८) सदरची लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शक पध्दतीने व सिसीटिव्ही कँमेरा तसेच व्हीडीओ कॅमेरा चे निगराणी खाली होणार असून उमेदवारांच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराचा अवलंब करु नये. तसे आढळुन आल्यास उमेदवारांना परिक्षेतुन बाद केले जाईल व भारतीय न्याय दंड संहिता प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) जे उमेदवार ०६/०७/२०२४ चे संध्याकाळी उशिराने येतील त्यांची राहण्याची सोय शोभा प्रकाश मंगल कार्यालय बस स्टँड जवळ जालना येथे मोफत सोय करण्यात आली आहे.

(अजय कुमार बंसल)
पोलीस अधिक्षक,जालना.

Scanned with OKEN Scanner